INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# LGBTQIA + संकल्पनेबद्दल दक्षिण मुंबईतील वय वर्ष १८ ते ४५ पर्यंतच्या लोकांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास

# (A Study of the Attitudes of People in the Age Range of 18 to 45 in South Mumbai towards the LGBTQIA+ Concept)

**शुभम रेखा शंकर पेडामकर**
प्राध्यापक,
गुरुनानक महाविद्यालय, जीटीबी नगर,
सायन (पु.), मुंबई(महाराष्ट्र, भारत)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2024-45235432/IRJHISIC2404016

**सार :**

*सर्वसामान्यतः लोकांचा समूह म्हणजे समाज असे ढोबळमानाने म्हणतात पण केवळ लोकांचा समूह म्हणजे समाज नव्हे. व्यक्तीहून निराळे असे स्वतंत्र अस्तित्व समाजाला असते. बघायला गेले तर मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. या उक्तीनुसार दैनंदिन व्यवहारात समाज हा शब्द धर्म, जात, वंश, वर्ग, लिंग आदी भेदांतील स्त्री-पुरूषांचा जनसमुदाय या अर्थी देखील वापरला जातो. समाजाचा अभ्यास केला तर खूप कमी प्रमाणात एका विशिष्ट विचारांनी, लैंगिकतेच्या बदलांनी निर्माण झालेल्या समाजाबद्दल लोकांना माहिती आहे आणि तो समाज म्हणजे LGBTQIA +*

***कळ शब्द*** *- LGBTQIA+ समाज, दक्षिण मुंबई, १८ ते ४५ वय वर्ष, दृष्टिकोनाचा अभ्यास*

**प्रस्तावना :**

मानवी समाजात आपल्याला लिंगामध्ये स्त्री आणि पुरुष हे दोनच लिंग सर्वसाधारणपणे माहिती आहेत पण नैसर्गिकरित्या जन्मलेला किंवा हार्मोन्स च्या बदलामुळे लिंगामध्ये बदल झालेल्या व्यक्ती देखील आपल्या आजूबाजूला वावरत असतात. काळानुरूप जसजसा बदल होत गेला तसतसा याच व्यक्तींचा एक समाज बनला आहे त्याला LGBTQIA+ समाज असे म्हंटले जाते. LGBTQIA+ हा काही अशा व्यक्तींचा समाज आहे ज्यांच्या लैंगिक भावना Sexual Feelings, इच्छा या काहीश्या वेगळ्या आहेत. या व्यक्तींची ओळख ही त्यांच्या रंगरुपावरून नव्हे तर त्यांच्या लैंगिक आवडी-निवडीवरून होत असते.



संपूर्ण जगभरात जून महिना हा वेगळी लैंगिक ओळख असलेल्या समुदायासाठी अभिमान महिना (Pride Month) म्हणून साजरा केला जातो. या महिन्यात भारतातही अनेक कार्यक्रम एलजीबीटीक्यू समुदायाकडून राबविले जातात. या कार्यक्रमादरम्यान अनेक संघटना इंद्रधनुष्याच्या रंगाचा एक झेंडा वापरतात. पण एलजीबीटीक्यू समुदायाचा हा झेंडा जुना आहे. जगभरातील समुदाय आता नवीन झेंडा त्यांच्या कार्यक्रमासाठी वापरतात. या नव्या ध्वजाला ‘‘इंटरसेक्स इनक्ल्युजिव्ह प्रोग्रेस प्राइड फ्लॅग असे म्हंटले जाते. व्हॅलेंटिनो व्हेछेट्टी यांनी हा झेंडा २०२१ साली यूके येथे झालेल्या ‘इंटरसेक्स इक्वॅलिटी राइट्स परिषदेसाठी तयार केला होता. डॅनिअल कैसर यांनी २०१८ साली

तयार केलेल्या झेंड्याचे हे नवे प्रारूप आहे.

**LGBTQIA+ या शब्दाचा अर्थ विस्ताराने लक्षात घ्यायचा झाला तर -**

**१. L लेस्बियन** - L म्हणजेच लेस्बियन हा शब्द समलैंगिक महिलांसाठी वापरला जातो. ज्या महिला इतर महिलांकडे आकर्षित होतात किंवा ज्यांना इतर महिलांची लैंगिक ओढ असते. त्यांच्याशी प्रेमसंबध तसचं लैंगिक संबध ठेवत असतात त्या लेस्बियन गटात येतात. काही वेळेस या महिलांना देखील इतर महिलांप्रमाणे नटायला सजायला आवडत असते. तर काही महिला पुरुषांप्रमाणे रहाणं देखील पसंत करत असतात.

**२. G गे** - समलैंगिक पुरुषांसाठी हा शब्द वापरला जातो. जे पुरुष इतर पुरुषांकडे आकर्षित होतात. पुरुषांशी लैंगिक संबध ठेवातात. भावनिकदृष्ट्या पुरुषांशीजे जोडले जातात. त्यांना गे असे म्हंटले जाते.

**३. B बी** – B म्हणजे बायसेक्शुअल- या गटातील महिला किंवा पुरुष एकंदर या गटातील कोणतीही व्यक्ती समान लिंगासोबतच इतर सर्व लिंगाच्या व्यक्तींकडे आकर्षित होतात यालाच बायसेक्शुअल Bisexual म्हणतात. यात महिला किंवा पुरुष दोघं बायसेक्शुअल असू शकतात. म्हणजे समजा या गटातील एखादा पुरुष पुरुषांसोबत संबध ठेवण्यासोबतच महिला किंवा ट्रान्सजेंडर व्यक्तीशीही संबध ठेवत असतो.

**४. T ट्रान्सजेंडर** - या व्यक्ती थर्ड जेंडरमध्ये येतात. म्हणजे काही व्यक्ती ज्या लिंगाने जन्माला येतात पुढे जाऊन त्यांचं वागणं किंवा आवड किंवा भावना मात्र इतर लिंगाच्या व्यक्ती प्रमाणे असतात. उदाहरण घ्यायचं झाल्यास जर एखादा मुलगा पुरुष लिंगासह जन्म घेतो. मात्र जसं जसा तो मोठा असतो तो महिलांप्रमाणे वागू लागतो. त्याच्या आवडी निवडी किंवा भानविनिकदृष्ट्या तो महिलांसारखा असतो. त्याची जीवन जगण्याची पद्धत महिलांप्रमाणे असते. ते स्वतःला स्त्री समजतात अशांना ट्रान्सवुमन म्हणतात. या उलट ज्या महिला स्वत:ला पुरुष मानू लागतात आणि त्या प्रमाणे आयुष्य जगू लागतात त्यांना ट्रान्समेन म्हणतात. यातील अनेकजण अलिकडे सर्जरीच्या मदतीने लिंग देखील बदलून घेत आहेत.

**५. Q क्वीयर** - Queer ज्या व्यक्ती त्यांची लैंगिक ओढ किंवा त्यांचं आकर्षण नेमकं कुणासाठी आहे हे ठरवू शकत नाही. म्हणजेच जे स्वत:ला पुरुष, महिला किंवा ट्रान्सजेंडरही मानत नाहीत. त्यांना क्वियर म्हणतात. ते पूर्णपणे लेस्बियन नसतात किंवा गे आणि बायोसेक्शुअलही नसतात. त्याचं लैंगिक आकर्षण वेळोवेळी बदलत राहते. म्हणून क्वियरचा क्यू Q हा QUESTIING या अर्थाने ओळखला जातो.

**६. I इंटरसेक्स** - जन्मत: ज्या व्यक्तींच्या जननेंद्रियांमध्ये म्हणजे प्रायव्हेट पार्टमध्ये काही दोष असतात किंवा यावरून ते नेमके स्त्री आहेत कि पुरुष हे लक्षात येत नाही त्यांना इंटरसेक्शुअलम्हणतात.

**७. A एसेक्शुअल** - ज्या व्यक्तीला कोणत्याही लिंगाच्या व्यक्तीसोबत सेक्स म्हणजेच शारिरीक संबंधांसाठीरुची नसते त्यांना एसेक्शुअल म्हणतात.

तर प्लस (+) मध्ये अशा व्यक्तींचा समावेश होतो जे LGBTQIA च्या कोणत्याचं गटात बसत नाहीत. यातील कोणत्याच गटात आपण फिट बसत नाहीत मात्र आपली लैंगिक गरज हे सामान्यांपेक्षा विभिन्न आहे असं ज्यांना वाटते ते या गटात येत असतात.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

**१. तफावत अभ्यासणे** - नैसर्गिक नियमांनुसार पुरुष आणि महिला हा लिंग प्रकारच आपल्याला माहिती आहे कारण तशी शिकवण आपल्याला चालता बोलता दिली जाते परंतु या व्यतिरिक्त असणाऱ्या दुर्लक्षित समाजाबद्दल सहसा मनमोकळेपणाने कुणीच बोलत नाही त्यामुळे समाजाची तफावत अभ्यासता यावी या हेतूने या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**२. दृष्टिकोन जाणून घेता यावा** - शोध निबंधात मांडला गेलला समाज अभ्यासण्यासारखा आहे त्यात प्रामुख्याने दक्षिण मुंबईतील लोकांचा विचार करण्यात आला आहे. त्यामागची दोन कारणे म्हणजे शोध निबंध सादर करताना भौगोलिक सीमा आखल्या तर मिळणारे निष्कर्ष अचूक मिळू शकतील आणि दुसरे कारण म्हणजे दक्षिण मुंबईतील बऱ्याच लोकांचे राहणीमानाचा स्तर हा उच्च आणि शैक्षणिक दृष्ट्या लोक देखील सुशिक्षित आहेत.

**३. आयुष्य जगण्याची पद्धत समजून घेणे** - सर्वसामान्य व्यक्तींसारखं देखील LGBTQIA+ आयुष्य आहे का या प्रश्नाची उकल शोधून काढण्याचा प्रयत्न.

**४. LGBTQIA + प्रचार प्रसार करणे** - दुर्लक्षित समाजाबद्दल लोकांना देखील माहिती व्हावे आणि आजूबाजूला अशी कोणतीही व्यक्ती आढळली तर त्यांना आदरपूर्वक वागणूक देणे याची शिकवण देण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**शोध निबंधाच्या मर्यादा :**

1. दक्षिण मुंबईतील लोकांच्याच प्रतिसादांचा अभ्यास करणे. (भौगोलिकरित्या आखलेली मर्यादा)
2. आठवड्याभरात आलेल्या लोकांच्या प्रतिक्रियांचाच फक्त अभ्यास करणे. (वेळेची मर्यादा)
3. वय वर्ष 18 ते 45 असणाऱ्या लोकांचे प्रतिसाद स्वीकारणे. (वयाची मर्यादा)

**शोध निबंधाची गृहीतके :**

1. LGBTQIA + समाजाबद्दल लोकांना माहिती नाही.
2. समाजातील LGBTQIA + हा समाज लोकांना मान्य नाही.

**शोध निबंधाची पद्धत :**

**1. मुलाखत** - शोध निबंध सादर करत असताना मुलाखत हा प्रकार फायदेशीर ठरत असतो. शोध निबंधकाला निवडलेल्या विषयाला धरून संबंधितव्यक्ती/ अभ्यासक/ तज्ञ यांच्याशी संवाद साधून मिळालेल्याउत्तरांमुळेशोध निबंधातील तथ्य सादर करण्यास मदत होते.

**2. प्रतिक्रिया** - विषयाला धरून प्रश्न विचारला जातो आणि त्यावर वेगवेगळ्या किंवा एकाच नमुन्याच्या व्यक्तींची मतं ऐकून घेतली जातात तेव्हा त्यास प्रतिक्रिया म्हंटले जाते. प्रतिक्रिया देणाऱ्या व्यक्तीच्या सहमतीने त्या व्यक्तीचे नाव व फोटो शोध निबंधात मांडण्याचा अधिकार शोध निबंधकाला असतो.

**3. गटचर्चा** - शोध निबंधक संबंधित विषयाला धरून एका विशिष्ट वर्गाशी चर्चा करतात त्यालाच आपण फोकस ग्रुप डिस्कशन असे म्हणू शकतो. या गट चर्चेमधून विषयाला धरून शोध निबंधकाला मांडलेली गृहीतके पडताळण्याची संधी मिळते.

**4. गूगल फॉर्म डेटा** - प्रत्यक्ष भेटणे शक्य होत नसल्यास शोध निबंधकाला गूगल फॉर्म बनवावा लागतो आणि लोकांना पाठवून त्यांना फॉर्म भरण्यासाठी विनंती करावी लागते. गूगल फॉर्मच्या मदतीने बराच डेटा शोध निबंधकाला प्राप्त होतो.

**शोध निबंधासाठी तयार केलेल्या गूगल फॉर्मची प्रश्नावली :**

१. सोशल माध्यमांच्या वापरामुळे LGBTQIA+ समाजाबद्दल आपल्याला माहिती मिळत आहे का?
२. LGBTQIA+ समाजाबद्दल विनाकारण गैरसमज पसरवले जातात असं तुम्हाला वाटते का?
३. सर्व सामान्य लोकांसारखं LGBTQIA+ समाज त्यांचे आयुष्य जगत आहे. असं तुम्हाला वाटते का?
४. LGBTQIA+ समाजाला खालीलपैकी कोणत्या समस्यांना सार्वधिक सामोरे जावे लागते असं तुम्हाला वाटते.
५. दोन समान लिंग असणाऱ्या व्यक्तींनी लग्न केले तर त्यावर तुमचं मत काय असेल?
६. LGBTQIA+ समाज दिवसागणिक वाढत चालला आहे. त्यावर तुमचं मतं काय आहे.
७. संशोधन विषयाबद्दल तुम्हाला काय वाटतं?
८. LGBTQIA+ संदर्भात अजून कोणत्या विषयावर संशोधन व्हावे असं तुम्हाला वाटते.

शोध निबंधाच्या विषयाला धरून शोध निबंधकाने LGBTQIA + समाजातील **तीन** व्यक्तींसोबत फोनवर संवाद साधला असता खालील प्रतिक्रिया प्राप्त झाल्या आहेत.

LGBTQIA + समाजातील जर कुणी व्यक्ती आजूबाजूला आढळली तर मानसिक दृष्ट्या वेडी असल्याचे समजले जाते. जेव्हा मी गे आहे असं घरात सांगितलं तेव्हा मला माझ्या घरच्यांनी घरातून कायमचं बाहेर निघण्यासाठी सांगितलं. त्यावेळी मला कुणीच समजून घेतलं नाही फक्त माझ्या आयुष्यात असणाऱ्या व्यक्तीने मला साथ दिली. मी माझं अस्तित्व स्वीकारलं आहे आणि त्याचा मला सार्थ अभिमान आहे.

**(मूळची ही व्यक्ती उडीसा मधून मुंबईत कामासाठी आलेली आहे.)**

आम्ही दोघीहीं एकाच शाळेत होतो नंतर पुढे एकाच कॉलेजमध्ये शिक्षण झाले.लहानपानापासूनच आम्ही दोघी एकमेकांची काळजी घेत होतो. जसजसें मोठे होऊ लागलो तसतसें आम्हांला कळलं की आम्हांला पुरुषांप्रती जराही आकर्षण वाटतं नाही. आम्ही दोघीही एकमेकींना खूप आवडायचो, मनापासून प्रेम करायचो, मानसिक,भावनिक आणि पुढे शारीरिक आकर्षण देखील झालं मग याबद्दल

डॉक्टरांशी संवाद केल्यानंतर कळलं की आम्ही दोघीही लेस्बियन आहोत. आज आम्ही दोघी एकत्र राहतो, खूप छान आयुष्य जगत आहोत.

**(मूळची ही व्यक्ती मध्य प्रदेशची आहे, कामानिमित्त मुंबईत रहाते.)**

मला लहानपणापासूनच मुलींसारखं राहायला आवडायचं. मी भांडीकुंडी खेळायचो, साडी घालायचो, मस्तपैकी मेकअप करायचो. लहान होतो म्हणून कुणी काही बोलायचं नाही पण जसजसा मोठा होत गेलो तसतसा मला या गोष्टी खूप आवडू लागल्या. आवाज देखील सॉफ्ट असल्याने काय मुलींसारखं बोलतोस असं लोक बोलायची, मर्दासारखं रहा असं बोलायची पण मला कधीच जमलं नाही शेवटी मी ट्रान्सजेंडर आहे हे घरात सांगितलं आणि मला घराचे दरवाजे कायमचे बंद झाले. ज्या आईवडिलांनी मला वाढवलं त्यांनीच मला कायमच दूर केलं. आजही त्यांच्या एका हाकेसाठी माझे कान आसुसले आहेत.

**(ही व्यक्ती मुंबईत राहत असून मुंबईतच कामाला आहे.)**

**(टीप - प्रतिक्रिया देणाऱ्या तिघांनी नाव न लिहिण्याची विनंती केली आहे त्यामुळे त्यांचे नाव व फोटो दाखवता येणार नाही)**

शोध निबंधकाने दहा हजार प्रेक्षक वर्ग असणाऱ्या "**द महाराष्ट्र न्यूज**" या न्यूज वेब पोर्टलसाठी LGBTQIA + समाजातील **दोन व्यक्तींच्या लाईव्ह** मुलाखती घेतल्या आहेत.




झी युवा या मराठी चॅनलमध्ये युवा डान्सिंग क्वीन या रियालटी शो मध्ये पहिल्यांदा ट्रान्सजेंडर व्यक्तीने शो चे सूत्रसंचालन केले ती व्यक्ती म्हणजे प्रणित हाटे. आताची गंगा. याच गंगाला स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून लाईव्ह मुलाखतीमध्ये खालील प्रश्न विचारण्यात आले होते.

१. प्रणित हाटे ते गंगा हा प्रवास नेमका कसा होता आणि त्यात तुला कश्याप्रकारे स्ट्रगल करावा लागला आहे?

२. आज तू कोणत्याही बंधनात न राहता स्वतंत्रपणे काम करत आहेस. कसं वाटतं आहे?

३. युवा डान्सिंग क्वीन या रियालिटी शो मध्ये सुत्रसंचालिकादेखील तू होतीस काय अनुभव होता?

४. प्रणित हाटे ते गंगा हा प्रवास वाटतो तितका सोप्पा नाही आहे. या काळात घरांच्या मंडळींनी कश्याप्रकारे पाठिंबा दिला आहे.

५. प्रत्येकाला आरसा काहीतरी शिकवण देत असतो. गंगाला आरश्याने काय शिकवण दिली आहे.

६. समाजात आज अश्या अनेक गंगा असतील ज्यांना अजूनही मुक्तपणे वावरता येत नाही आहे त्याबद्दल त्या गंगाना काय सांगशील.

७. प्रत्येकाची बकेट लिस्ट असते. गंगा तुझी नेमकी बकेट लिस्ट काय आहे?

८. तुला भविष्यात अजून तुझी कोणती स्वप्न पूर्ण करायची आहेत.

या सर्व प्रश्नांवर गंगाने अतिशय सुंदररित्या उत्तरे दिली.




दुसरी मुलाखत घेण्यात आली होती ती म्हणजे भारतातील पहिली ट्रान्सजेंडर फोटोजर्नालिस्ट जोया लोबो ची. जोया यांना लाईव्ह मुलाखतीमध्ये खालील प्रश्न विचारण्यात आले होते.

१. माध्यमात आपण काम करावं असं कधी वाटलं होतं का ? प्रवास नेमका कसा सुरु झाला.

२. आजच्या तरुणाईला फोटोजर्नालिस्ट म्हणून करिअर करायचं असेल तर नेमकं काय केलं पाहिजे.

३. तुमच्या अनुभवातून फोटोजर्नालिजम मध्ये करिअरच्या संधी नेमक्या कोणत्या आहेत?

४. फोटोजर्नालिस्ट म्हणून करिअर करत असताना घरच्या मंडळींनी कश्याप्रकारे पाठिंबा कसा दिला?

५. एक पहिली ट्रान्स जेंडर फोटोजर्नालिस्ट म्हणून समाजात वावरत असताना काय अनुभव येतात?

६. आजच्या तरुणाईने फोटोजर्नालिजम मध्ये करिअर करत असताना कोणत्या गोष्टींकडे प्रामुख्याने लक्ष देणं गरजेचं आहे.

७. फोटोजर्नालिस्ट म्हणून तू अनेक प्रोजेक्ट केले असतील पण त्यातील तुझ्या लक्षात राहणाऱ्या संकल्पना कोणत्या व का?


८. तुला तुझा पहिला काढलेला फोटो आठवतो का? त्याबद्दल काय सांगशील?


९. तुझ्या मते माध्यमात काम करणाऱ्या एका आदर्श फोटोजर्नालिस्ट मध्ये कोणते गुण असावेत.

१०. आजवरचा माध्यम क्षेत्राचा प्रवास तुला काय शिकवतो?


११. जेव्हा तू आरश्यात बघतेस तेव्हा तुला तुझा आरसा काय सांगतो?


LGBTQIA + संकल्पनेबद्दल दक्षिण मुंबईतील वय वर्ष १८ ते ४५ पर्यंतच्या लोकांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास या शीर्षकाखाली दक्षिण मुंबईत राहणाऱ्या व कामासाठी येणाऱ्या लोकांच्या (विद्यार्थी, शिक्षक, पालक, कामगार इ.) मतांचा अभ्यास करता यावा यासाठी शोध निबंधकाने गूगल फॉर्म बनविला आणि फॉर्म भरण्यासाठी विनंती केली. त्या गूगल फॉर्मच्या माध्यमातून एकूण **२०१** लोकांकडून प्रतिसाद प्राप्त झाला असून थोडक्यात डेटा खालीलप्रमाणे मांडण्यात आला आहे.





LGBTQIA + संकल्पनेबद्दल दक्षिण मुंबईतील वय वर्ष १८ ते ४५ पर्यंतच्या लोकांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास या विषयाचा अभ्यास करण्यासाठी शोध निबंधकाने गूगल फॉर्म बनविला आणि प्रश्नावली मध्ये लिंगाचे तीन गट तयार केले. त्यात पुरुष, स्त्री आणि इतर यांचा समावेश केला गेला. त्याचबरोबर वयाचे देखील तीन गट तयार करण्यात आले. ज्यात वय १८ ते २५, २६ ते ३५ आणि ३६ ते ४५ यांचा समावेश करण्यात आला.





२०१ लोकांच्या प्रतिसादामध्ये ८७. १ % लोकांना सोशल माध्यमांच्या वापरमुळे LGBTQIA+ समाजाबद्दलची माहिती मिळाली आहे. यावरून सोशल माध्यमातून समाजाबद्दल माहितीचा प्रसार किती प्रभावशाली होऊ शकतो हे देखील लक्षात येते.

६१. ७ % लोकांना असं वाटते की LGBTQIA+ समाजाबद्दल विनाकारण गैरसमज पसरविले जातात तर ३८.३ % लोकांना असं वाटत नाही.







४१.३ % लोकांच्या मते LGBTQIA+ समाज सर्वसामान्य लोकांसारखं आयुष्य जगत नाही असे वाटते तर ५८. ७ % लोकांना वाटते की LGBTQIA+ समाज सर्वसामान्य लोकांसारखं आयुष्य जगतात.

LGBTQIA+ आजच्या घडीला कोणत्या समस्यांना सर्वाधिक सामोरे जावे लागते याचा अभ्यास करण्यासाठी शोध निबंधकाने पाच समस्या मांडल्या होत्या त्याचा टक्के व आकडेवारीनुसार माहिती तक्ता खालीलप्रमाणे

| अनु क्र. | LGBTQIA+ समाजाला सामोरे जाव्या लागणाऱ्या समस्या | टक्केवारीनुसार | आकडेवारीनुसार |
|---|---|---|---|
| १. | ते स्वतःची ओळख सर्वांना सांगू शकत नाही. | ६१.७ % | १२४ |
| २. | समाजाने अजूनही त्यांचं अस्तित्व मान्य केले नाही आहे | ६३.२% | १२७ |
| ३. | त्यांचे मानसिक व शारीरिकरित्या खचीकरण केले जाते. | ४०.८% | ८२ |
| ४. | समाजातील दुर्लक्षित घटक म्हणून त्यांचा आदर केला जात नाही. | ४४.८% | ९० |
| ५. | मुद्दामून त्यांच्यावर हल्ला केला जातो. | २९.४ % | ५९ |

दोन समान लिंग असणाऱ्या व्यक्तींनी लग्न केले तर त्यावर तुमचं मत काय असेल? त्यावर बऱ्याच लोकांनी सकारात्मक दृष्टिकोन दर्शवला असून प्रत्येकाला स्वतःचे आयुष्य स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे त्यामुळे त्यांनी लग्न केले तरी काही हरकत नाही शेवटी भावना महत्त्वाच्या आहेत अशी मतं व्यक्त करण्यात आली आहे तर काहींनी निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन होत आहे, हे वेळीच थांबले पाहिजे असे ठामपणे मतं मांडले आहे.


5. दोन समान लिंग असणाऱ्या व्यक्तींनी लग्न केले तर त्यावर तुमचं मत काय असेल ?
(What would be your opinion if two people of the same sex get married?)
201 responses
Is their life and their choose if they are happy and want to spend whole life together then they should live without any restrictions.
I would not mind
I agree with this concept.
It's ok if they are happy
They can
It is against natural law and must not prevail in society
It's good if they are happy
If they take responsibility of each other and if they are happy together, then there is nothing wrong.

6. LGBTQIA+ समाज दिवसागणिक वाढत चालला आहे. त्यावर तुमचं मतं काय आहे.
(LGBTQIA+ community is growing day by day. What is your opinion on it?)
201 responses
I do not feel like it is growing in number. There would definitely have been these many people the only reason is that alot of people are coming out as the LGBTQ+ community and feeling safe to accept their identity.
Yes, they are not respected in the society hence they are migrating themselves.
I feel people'l like comfort zone same gender are share more comfort zone in view of different gender
All are human beings so no problem
it's an natural process.
They should, why not after all they are also human being and whe are living in this society where everyone has there own life
It's good that people are accepting and talking about their identity in society. It is a good sign that they are accepting and embracing themselves the way they are.

7. संशोधन विषयाबद्दल तुम्हाला काय वाटतं ?
(What do you think about the research topic?)
201 responses
Appreciable
Good for public awareness....
Nice to know the view of people
समाजातील दुर्लक्षित बाजू वर अजून चांगल्या पद्धतीने विचार करण्याची एक संधी
Relevant topic
Its really a needy topic for the Society
Its a great research topic with a vast scope to learn
Current affairs topic
It's good topic

8. LGBTQIA+ संदर्भात अजून कोणत्या विषयावर संशोधन व्हावे असं तुम्हाला वाटतं.
(What topics do you think should be further researched regarding LGBTQIA+?)
201 responses
Equality
Research topics regarding LGBTQIA+ could include healthcare disparities and mental health, intersectionality, legal and policy issues, family dynamics, education, economic inequality, transgender experiences, media representation, and historical perspectives.
Nil
NA
Education
Te kontya prakare stable hotat te ajunahi samjat nahi
On mental health...for all...
Make them understand n live a normal healthy life

LGBTQIA+ समाज दिवसागणिक वाढत चालला आहे. त्यावर तुमचं मतं काय आहे शोध निबंधकाने असा प्रश्न केला असता त्यावर, हा समाज वाढला नाही पाहिजे, येणाऱ्या पिढीसाठी धोक्याची घंटा आहे असे प्रतिसाद प्राप्त झाले आहेत तर काहींनी ते देखील आपल्यासारखी माणसं आहेत त्यांना आपण स्वीकारले पाहिजे, त्यांचा आदर केला पाहिजे. त्यांच्या भावनांचा आदर केला पाहिजे असे मतं मांडले आहे.

शोध निबंधकाने शोध निबंधासाठी निवडलेला विषय खूपच इंटरेस्टिंग युनिक आहे, त्याचबरोबर अश्या विषयांवर संशोधन होणे गरजेचे आहे, सुंदर विषय असा ८९ % प्रतिसाद दिला आहे. तर भविष्यात LGBTQIA+ संदर्भात त्यांच्या शिक्षणाबद्दल, आरोग्याबद्दल, समाजातील राहणीमानाबद्दल संशोधन व्हावे असे सल्ले गूगल फॉर्मच्या प्रतिसादातून आहे.

**समारोप :**

LGBTQIA + संकल्पनेबद्दल दक्षिण मुंबईतील वय वर्ष १८ ते ४५ पर्यंतच्या लोकांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास या शीर्षकाखाली शोध निबंधाच्या अभयासकरित असताना शोध निबंधकाला LGBTQIA + समाज खूप जवळून अभ्यासण्याची संधीमिळाली. LGBTQIA + ही एक विकृती आहे असं समाजात बऱ्याच ठिकाणी म्हंटले जाते किंवा फॉरेन ट्रेंड भारतात रुजवलं जातं असे देखील म्हंटले जाते परंतु वास्तवात मात्र तसं नसून पुराणातील शिखंडीदेखील LGBTQIA + समाजातील होते असं आपण म्हंटले तरी वावगं ठरणार नाही. आजच्या घडीला शोध निबंधकाने मांडलेली दोन्ही गृहीतके चुकीची ठरली आहेत. आज बहुतांश लोकांना उदाहरणार्थ १०० पैकी ८६ % लोकांना तरी LGBTQIA + समाजाबद्दल माहिती आहे तर दुसरीकडे समाज माध्यमाच्या वाढत्या वापरामुळे लोकांना हळहळू या समाजाची माहिती मिळत आहे. लोक देखील या समाजाला आता स्वीकारू लागले आहेत. प्रत्येकाने त्यांचे आयुष्य मनसोक्तपणे जगावे अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे बहुतेक कोरोना महामारीमुळे लोकांचे आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे हा देखील नक्कीच संशोधनाचा विषय होऊ शकतो. शोध निबंधकाने घेतलेल्या प्रतिक्रिया, मुलाखती, गूगल फॉर्म च्या मदतीने खालील निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

1. स्वीकारण्याची भावना - LGBTQIA + समाजातील लोक देखील माणसं आहेत आणि माणसाने माणसाशी माणसा सम वागणे ही भावना आता वाढत चालली आहे.
2. आयुष्य मनसोक्त जगावे - कोणत्याही ताण-तणावात न जगता प्रत्येकाने स्वतःचे आयुष्य मुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे जगावे अशी मतं लोकांची निर्माण झाली आहे.
3. पाठिंबा असावा - आपल्या आजूबाजूला LGBTQIA +समाजातील कुणीही व्यक्ती असेल तर त्या व्यक्तींची खिल्ली न उडवता आपण त्यांचा आदर केला पाहिजे अशी मतं बनत चालली आहे.

**ऋणनिर्देश :**

कोणताही शोध निबंध सहकार्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. शोध निबंधासाठी शीर्षक सुचवणाऱ्या कीर्ती महाविद्यालयातील समाजकार्य पदविका अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा.अमेय महाजन सर तसेच मराठीमधून शोध निबंध कसे लिहावे यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्रा.डॉ. विमुक्ता राजे व डेटा संकलित करण्यासाठी मदत करणाऱ्या सायन येथील गुरुनानक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पुष्पिदंर भाटिया व वेळोवेळी प्रश्न पडल्यानंतर त्या प्रश्नांची उत्तरे देणारे प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी या सर्वांचे मी मनापासून आभारी आहे. या सर्वांच्या सहकार्याशिवाय माझा शोध निबंध पूर्णत्वास गेला नसता याबद्दल मी त्यांचा शतश: ऋणी असेल.

**संदर्भसूची:**

१.https://lokmat.news18.com/amp/lifestyle/what-is-lgbtqia-community-saurabh-kirpal-could-be-indias-first-gay-delhi-high-court-judge-mhsd-gh-631218.html

२. https://marathi.indiatimes.com/editorial/article/lgbt-community/amp_articleshow/68078219.cms

३.https://prahaar.in/what-exactly-is-the-lgbtqia-community-that-will-hear-the-same-sex-marriage-case-today/amp/

४. https://www.facebook.com/share/v/yYwkVTC3hZDWcZAq/?mibextid=Dpxkx3 - जोया लोबो लाईव्ह मुलाखत

५.https://www.facebook.com/share/v/hCbzvWuqQN1Hi2M2/?mibextid=Dpxkx3 - प्रणित हाटे उर्फ गंगा लाईव्ह मुलाखत

६. https://forms.gle/q8qKfYg62TtZKHdg9 - गूगल फॉर्म लिंक